Impact Factor – 6.261 | Special Issue - 145 | Feb. 2019 | ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

# RECENT TRENDS IN ENGLISH, MARATHI, HINDI LANGUAGE AND LITERATURE

- GUEST EDITOR -

**Principal Dr. P. P. Sharma**

- CHIEF EDITOR -

**Dr. Dhanraj T. Dhangar**

- EXECUTIVE EDITORS -

**Dr. S. S. Chouthaiwale**

**Dr. A. T. More | Dr. P. S. Patil**

Printed By : **PRASHANT PUBLICATIONS, JALGAON**

Shivaji College Dist. Hingoli

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Shivaji College Hingoli, Dist. Hingoli

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 145 ▪ Feb. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

**RESEARCH JOURNEY**

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

*One Day National Seminar On*

# RECENT TRENDS IN ENGLISH, MARATHI AND HINDI LANGUAGE AND LITERATURE

... Organized by ...

*Ajantha Education and Military Preparatory Institute, Aurangabad's*

**Indraraj Arts, Commerce & Science College, Sillod,**

Dist. Aurangabad - 431112 (M.S.)

... Guest Editor ...

**Dr. P. P. Sharma**

Principal

... Chief Editor ...

**Dr. Dhanraj T. Dhangar**

... Executive Editor ...

**Dr. S. S. Chouthaiwale** (English)

**Dr. A. T. More** (Marathi)

**Dr. P. S. Patil** (Hindi)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Printed by : PRASHANT PUBLICATIONS, JALGAON

Shivaji College Hingoli Dist. Hingoli

Impact Factor – 6.261 ▪ Special Issue - 145 ▪ Feb. 2019 ▪ ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

RESEARCH JOURNEY

UGC Approved Journal

Multidisciplinary International E-research Journal

*One Day National Seminar On*

# RECENT TRENDS IN ENGLISH, MARATHI AND HINDI LANGUAGE AND LITERATURE

... Organized by ...

*Ajantha Education and Military Preparatory Institute, Aurangabad's*

**Indraraj Arts, Commerce & Science College, Sillod,**

Dist. Aurangabad - 431112 (M.S.)

Printed by

PRASHANT PUBLICATIONS

3, Pratap Nagar, Sant Dnyaneshwar Mandir Road, Near Nutan Maratha Mahavidyalaya, Jalgaon.

Website: www.prashantpublications.com Email: prashantpublication.jal@gmail.com

Ph: 0257-2235520, 2232800, 9665626717, 9421636460

**EDITORIAL POLICIES -** Views expressed in the papers / articles and other matter published in this issue are those of the respective authors. The editor and associate editors does not accept any responsibility and do not necessarily agree with the views expressed in the articles. All copyrights are respected. Every effort is made to acknowledge source material relied upon or referred to, but the Editorial Board and Publishers does not accept any responsibility for any inadvertent omissions.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

43. Recent Trends & Developments in Indian English Fiction ........ 125
Dr. [illegible] S. [illegible]wade

44. Recent Trends in Diasporic Writing : An overview of Women Writers ........ 127
Dr. Ravikant B. Jadhavar

45. New Trends in English Literature ........ 130
Pravin Ratan Berad

46. Science Fiction : Aspects and Prospect ........ 132
Asst. Prof. J. D. Pardeshi

47. Recent Trends in Classroom Teaching for Physics Subject ........ 135
C. M. Kale, M. K. Bahrekar

48. Recent Trends of Communication skills in English Language ........ 137
Dr. Asmita Sharad Salve

49. Racism In English Literature ........ 142
Dr. D. N. Ganjewar, Dr. Korde Rajabhau Chhaganrao

50. Sport Culture and Indian Literature ........ 147
Dr. Navle Balaji Anandrao

51. Recent Trend In Feminism In The Poetry Of Indian English Poetess ........ 149
Dr. Vijay D. Misal

52. Marathi as Official Language of Govt. of Maharashtra ........ 153
K. A. Rajput and D. A. Jadhav

53. Dimensions of Storytelling in Film ........ 155
Dr. Nitin Anand Anbhule

54. Recent Trends in College Libraries ........ 157
Dr. Mhaske S.M.

55. Jotirao Phule and Educational Reforms in Modern India ........ 159
Vishakha T Kolambikar, Dr. Santosh S Chouthaiwale

## मराठी

५६. वर्तमान मराठी वाङ्मय प्रवाहाची स्थितीगती (दलित) ........ १६२
डॉ. प्रताप मारुती गायकवाड

५७. आधुनिक आदिवासी मराठी साहित्याची समीक्षा ........ १६५
प्रा. ज्ञानेश्वर किसन म्हात्रे

५८. माहितीपट : संकल्पना व निर्मितीची प्रक्रिया ........ १६७
प्रा. हरिभजन राम कांबळे

५९. वर्तमान दृक-श्राव्य माध्यमांचे मराठी प्रादेशिक बोलीच्या प्रसारात योगदान ........ १६९
प्रा. डॉ. अण्णा प्र. वैद्य

६०. 'मराठी साहित्यात अनुवादित स्त्री नाटककारांचे योगदान ........ १७२
प्रा. डॉ. जगतवाड एस.पी.

६१. 'दलित साहित्य प्रवाहाची स्थितिगती' ........ १७५
प्रा. शिवदास प्रभाकर गिरी

६२. कवयित्रींच्या काव्यातील वास्तवदर्शन ........ १७८
प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli.

Shivaji College Dist. Hingoli

# कवयित्रींच्या काव्यातील वास्तवदर्शन

प्रा. डॉ. श्रीराम मारोतराव कऱ्हाळे
मराठी विभागप्रमुख, शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

मराठी साहित्यात प्रामुख्याने १९६० नंतर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी, जनवादी, आदिवासी, महानगरी वाङ:मय प्रवाह निर्माण झाले. स्त्रीवादी साहित्यात स्त्रीयांनी त्यांच्या समस्या मांडल्या आहेत. स्त्रीवादी साहित्यातील कविता हा साहित्य प्रकार ही सातत्याने प्रवाहीत राहिला आहे. २०१० नंतरच्या साहित्यात हा प्रवाह प्रबळपणे अभिव्यक्त होताना दिसतो.

कविता ही अंतर्मनाचा ठाव घेत असते. हृदयात कोंडलेल्या भाव भावना कवितेच्या रूपाने बाहेर पडत असतात. कविता लिहिल्यानंतर कवीला आत्मविष्कार केल्याचा मोठा आनंद मिळत असतो. मनात दाटून आलेल्या भाव भावना व्यक्त कवितेतून होतात. आज पर्यंत समाजातील अक्षर आणि निरक्षर व्यक्तिनी या साहित्य प्रकाराचा आधार घेवून जीवन आनंदमयी बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

जगात पुरूषसत्ताक कुटूंब पध्दती सर्वात अधिक आहे. सर्व सत्तापुरूषाच्या हातात आहे. त्या सत्तेचा वापर करता येवो अथवा न करता येवो. पुरूष म्हणेल ती पूर्व दिशा ठरते. पितृसत्ताक कुटूंब पध्दती स्त्रियांना दुय्यम स्थान आहे. तिच्या कोणत्या ही भाव भावना विचार यांची दखल घेतली जात नाही. उलट तिच्यावर पारतंत्र्य लादल्या जाते. तिच्या जीवनातील ध्येय नाकारले जाते.,

'जीवन ध्येयाचा नवा संकल्प
बांधिला होता मनाने
नाकारले कसे कळेना
ध्येय सारेच या जगाने'[१]

स्त्री म्हणून जन्म घेतला आणि जगाने स्त्री जीवनातील स्वातंत्र्यच नाकारून टाकले आहे. आज समाजात आधुनिकतेचा उदय झाला आहे. समानतेचा अधिकार मिळालाय, अस ही म्हणता येत नाही.

'स्त्री न आज गुलाम, असं म्हणू नये
झाली ती मुक्त आज, असंही म्हणू नये
अजून ही होतो तिच्यावर घाव
अश्रुत होतो तिचा लिलाव'[२]

देशाला स्वातंत्र्य मिळालं, देशातील जनता स्वातंत्र झाली. पण स्त्रीच जीवन काय आहे ? आज ही तिच्या जीवनात घाव आहेत. समाजातील मनासारख्या पुरूषाशी विवाह करता येत नाही. मुलगा पसंत नसला तरी त्याला हुंडा देवून लग्न करावे लागते. सासरी सुख मिळो अथवा न मिळो याची कुणालाही पर्वा नसते. पुर्नविवाह करण्यासाठी समाज स्त्रीला संधी नाकारतो. समाजाच्या अन्याय अत्याचाराची ती बळी ठरते.

'अत्याचार बलात्काराचा, बळी ठरते स्त्री जेंव्हा.
तेंव्हा एक अहिल्या शिळा होते.
वाट बघते रामाजी
पण उध्दार कधी होतच नाही'[३]

स्त्री धामिक जीवनात पुरूषापेक्षा पुढे आहे. तिच्यावर होणाऱ्या अन्यायामुळे ती आपल्या जीवनाचा उध्दार करणारा कुणी तरी येईल. या भावनेत जगत असते. स्त्रीकडे बघत असताना मनात संघर्ष निर्माण होतात.

'प्रत्येक स्त्रीकडे पाहिले की, वाटतं
नवी कहाणी, नव्या समस्या, नवा संघर्ष
खूप दिवस कोंडलाय, नव्हे गाडलाय खोल काळजात
कुलूप बंद सहन शक्तीच्या चाव्या, कुठं शोधायच्या ?'[४]

स्त्री जीवनात निर्माण झालेल्या सहनशिलतेचे वर्णन कवयित्री करते. तिला सहन शिलतेतून बाहेर पडण ही मुश्किल झालेल आहे. समाजाने स्त्रीचे रक्षण केले पाहिजे. परंतू ते न करता भक्षण करण्याच्या मागेच समाज लागला आहे. अशी स्थिती समाजात निर्माण झाली आहे.

'तुझं पाऊल घराबाहेर पडताना
हजारो डोळे नजरेचा वार करतात
तुझ्या रसरसलेल्या ज्वानीवर
न्याहाळतात डोक्याच्या केसांपासून
पायाच्या नखां पर्यंत'[५]

पुरूषांच्या वाढत चाललेल्या विकृत मानसिक प्रवृत्तीचे चित्रण निर्मला पाटील यांनी केले आहे. त्या कवितेतून व्यक्त करतात की,

'कठोरातल्या कठोर शिक्षेलाही न जुमानता
घेत आहेत शोध
आपल्या हिंस्र वाईट नजरांनी
घराबाहेर पडलेल्या एकट्या स्त्रीचा'[६]

स्त्रीचा समाजात सन्मान व्हायला हवा. पण होता ना दिसत नाही. संधीचा फायदा विकृत मनोवृत्तीच्या व्यक्ती घेत आहेत. अशा लोकांना कठोर शिक्षा दिल्या जात आहेत.

तरी त्या गुन्हे करणे सोडत नाहीत. अशा मनोवृत्तीची माणसे कुठे ही उगवत असतांना दिसतात.

'कुठेही उगवणारी ही शेवाळाची जात
आणि कुणालाही बदनाम करण्यासाठी
उठणारे त्याचे हात
जपलं पाहिजे स्वत:ला त्यांच्या पासून'[७]

स्त्रीने जीवन जगत असतांना आपल्या जीवनात योग्य निर्णय घेवुन आपलं अस्तित्व टिकविलं पाहिजे. पुरूष संस्कृतीतील जाचाला कंटाळून स्त्री अतिशय भावविवश होवुन म्हणते,

'मला राग येतो. दु:ख होतं
मला रडू येते, मी माणूस आहे रे ! जीवंत.....
तुझ्या सारखी दगडाची मूर्ती नाही, जातीवंत'[८]

सजिवांना संवेदना असतात. त्याचा विचार केला पाहिजे. त्यांच्यात विचार करण्याचे सामर्थ्य असते. रूढी परंपरेला घट्ट मनात करून बसविलेला पुरूष म्हणजे जातीवंत दगड आहे असे ती म्हणते.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

स्त्रीवर करण्यात येणाचा अन्याय अत्याचाराची परिसिमा झालेली आहे. त्यातून बाहेर काढण्यासाठी ती, आर्त हांक देते.

'कुणीतरी या बंद बाटलीतून बाहेर काढाल का?
मी आंतून केव्हाच फुटली आहे.
तुटली आहे, कोसळली आहे
ही स्त्रीत्वाची, चारित्र्याची 'काच' सांभाळता सांभाळता...!'[९]

समाजात जगत असताना स्त्रीच्या जीवनाची आणि मनाची होणारी अंर्तबाह्य घुसमट संगीता गुरव यांनी व्यक्त केली आहे. स्त्री नशिबीला दोष देत जीवन जगत असते. जीवनात एखादी संधी मिळाली तर तिचा फायदा करून घेत नाही. तेंव्हा आता स्त्रीने त्या संधीचा फायदा घेवून लढायला शिकवलं पाहिजे. असे कवयित्री सुनिता काटम म्हणजे.

'नशीबाला दोष देऊन, किती अश्रु ढाळतेस
येणाज्या साज्या संधी, स्वत:च टाळतेस
डोळ्यानी नव्हे, तर मनाने लढायला शीक
पडणं नित्याचचं, जरासं चढायला शीक'[१०]

स्त्रीने संघर्ष करायला शिकल पाहिजे संघर्ष केल्या शिवाय स्वातंत्र्य मिळाणार नाही. या वास्तवाची जाणीव कवयित्री करून देते.

'वेळीच आवर रे तुझ्या मनोविकृतीला
दे मान समाजात तुझ्या माता-भगिनीला
अभिमान वाटो तुझ्या ढालीचा या नात्याला
सन्मानाने, निडरतेने जगु दे ममत्वाला'[११]

माणूस हा स्वार्थापायी विकृत झाला आहे. स्वार्थासाठी तो वाटेल ते करायला तयार आहे हे विकृतपण सोडून देवुन स्त्रियांना समाजात सन्मान देवून प्रेमाने जगु दे अशी अभिलाषा कवयित्री व्यक्त करते.

समाजात स्त्री आणि पुरूषाना समान दर्जा राज्यघटनेने बहाल केला आहे. शिक्षणाने विचार विवेकांची दारे खुली केली आहेत. न्याय काय ? आणि अन्याय काय याची जागृती समाजात झाली आहे. शांत राहू जगात काही मिळेलच याची खात्री नाही. म्हणून ती संघर्ष करताना दिसते.

'एकदाच बीज पेरून, तू मोकळा झालास
क्षणा-क्षणाला मीच देत होते रे त्याला निवारा'[१२]

स्त्री करीत असलेल्या कार्याचे महत्व विशद करून ती स्त्री-पुरूष समानतेची जाणीव ही करून देते.

'माझं नरव्हस होणं, तुला कळायचं नाही
तुझं भरकटत जाणं, मला चालायच नाही
पुरूष असला म्हणून काय झालं
म्हणून का ?
तू तुझ्या मर्यादांना पाळायचं नाही'[१३]

माणसाने जीवन जगत असताना मर्यादाचे पालन केले पाहिजे. मर्यादा सोडून वागल्यांने इतरांना त्रास सहन करावा लागतो. स्त्रीच्या जीवनात त्रास चालूच राहिला तर त्याची परतफेड व्याजासहित केली जाईल. अशी अर्थशास्त्रीय भाषा कवयित्री कवितेतून व्यक्त करते.

'खूप सोसियला त्रास, खूप सोसियल्या यातना
या साज्याची परतफेड
व्याजासहित आज मी करणार आहे.
काळजातील एक-एका घावाचा हिशेब
आज मी मागणार आहे.
माझ्या या नारीधर्माला
आज मी मनापासून जागणार आहे'[१४]

आजच्या काळात स्त्री ही स्वातंत्र्य मिळविण्यासाठी पेटून उठलेली आहे. हळव्या मनाची असलेली स्त्री खंबीर होताना दिसते. पुरूष पेक्षा आपण कुठेच कमी नाही. आपण ही म्हटल तर काही ही करू शकतो. याची जाणीव स्त्रीला झालेली आहे.

'वेळ नाही लागणार मला
काट्यान काटा काढायला
बघ येईल एके दिवशी शेरा
सव्वाशेर टक्कर मारायला'[१५]

पितृसत्ताक कुटूंब पध्दतीत स्त्री जीवन जगत असताना तिच्या वाट्याला आलेले अनेक दाहक प्रश्न ती कवितेतून मांडताना दिसते. निसर्गत: दुबळी असलेली स्त्री ही दुबळी नसून सबळ आहे. तिच्या असलेल्या सहन शक्तीच्या जोरावर ती जीवन जगत असते. जीवनात आलेले कडू गोड प्रसंगाना पचवित असते. परंतू आधुनिक युगात शिक्षणाने समृध्द झालेली स्त्री आपल्या हक्कासाठी लढताना दिसते. पुरूषाबरोबर समाजात स्त्रीला स्थान मिळाले पाहिजे यासाठी स्वत: बरोबर आपल्या स्त्रीवर्गाला प्रोत्साहित करताना दिसते. कवयित्रीच्या कवितेत एकंदरीत समाजातील वास्तव-घटना प्रसंगाचे यर्थाथ चित्रण आलेले आढळून येते.

**निष्कर्ष :**

२०१० नंतर प्रकाशित झालेल्या कवयित्रीच्या काव्यसंग्रहामधुन समकालीन जीवन येते. पितृसत्ताक कुटुंब पध्दतीचा आज ही प्रभाव असल्याचे जानवते. समकालीन स्त्री तिच्या ठिकाणी असलेल्या दुबळेपणा सोडुन सबळपणाचा आधार घेताना दिसते. आजही स्त्रीयांवर अत्याचार होत आहेत. याची जाणीव त्यांची कविता करुन देते. स्त्रीवादी साहित्याची चळवळ अखंडपणे चालताना दिसते.

**संदर्भ टिपा :**

१) अनुपमा हुंगे - धकाते - 'अनुपमसार' नील प्रकाशन, यवतमाळ प्र.आ.२०११ पृ.६०
२) वसुंधरा सुत्रावे - 'धरा' इसाप प्रकाशन नांदेड, प्र.आ.२०१६ पृ.७०
३) सुनिता भालेराव - 'बहरला पारिजात' स्वरमहिमा प्रकाशन, पुणे, प्र.आ.२०१३ पृ.४७
४) संगिता रमेश गुरव - 'तिच्या मनातलं' कौशिक प्रकाशन' सातारा, प्र.आ.२०१७ पृ.४४
५) सौ.निर्मला पाटील - 'तुझ्या अस्तित्वाच्या दरबळीत' निर्मिती संवाद कोल्हापूर, प्र.आ.२०१७ पृ.०८
६) सौ.निर्मला पाटील - उ.नि. पृ.६०
७) सुनिता काटम - 'डायरीचे पाने' अक्षर वाङ:मय प्रकाशन, पुणे, प्र.आ.२०१६ पृ.४९
८) संगिता रमेश गुरव - उ.नि. पृ.११८

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

९) संगिता रमेश गुरव - उ.नि. पृ.२६
१०) सुनिता कौटम - 'मी नदीचा कोण ?' अक्षर वाङ:मय प्रकाशन, पुणे, प्र.आ.२०१६ पृ.५३
११) सौ.स्मिता दोशी - 'स्मित गुंजन' साई प्रकाशन, मिरज, प्र.आ.२०१४ पृ.११
१२) सौ.स्मिता शिंदे - साळुंखे - 'वनव्यात स्त्री जन्माच्या' प्रतिमा पब्लिकेशन, पुणे, प्र.आ.२०१४ पृ.६७
१३) सौ.स्मिता शिंदे - साळुंखे - उ.नि. पृ.८०
१४) सौ.स्मिता शिंदे - साळुंखे - उ.नि. पृ.६३
१५) सौ.स्मिता शिंदे - साळुंखे - उ.नि. पृ.५६

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Shivaji College Hingoli Dist. Hingoli